भारती विदयापीठ पो स्टे पुणे

प्रेसनोट दिनांक-०४/०९/२०१९.

<u>१० वर्षे फरारी असलेल्या आरोपीस अटक करुन २६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे जप्त.</u>

भारती विदयापीठ ठाणे पुणे गुरन.१८१/२०१५, भादवि.कलम.३८० प्रमाणे महिला नामे सौ सविता सतिश पवार, वय ३९ वर्षे, धंदा गृहिणी, रा. स्वागत रेसी. प्लॅट नं.१०१, नारायणी धाम जवळ कात्रज पुणे यांनी सन.२०१५ साली आरोपी उदय विष्णु आवटे, वय ४० वर्षे, रा. कुंडल, ता.पलुस, जि.सांगली यांनी जुलै ते डिसेबर २००९ दरम्यान त्याच्या रहाते घरातुन ५०,०००/- रु चे २६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे चोरी करुन नेले होते. त्याबाबत वरिल प्रमाणे भारती विदयापीठ येथे तक्रार दिली होती. गुन्हा केल्यानंतर सन.२००९ पासुन आरोपी उदय विष्णु आवटे हा फरार झाला होता. सदर आरोपी हा सांगली येथे कुंडल येथे रहात असल्याबाबत माहिती पोलीस कर्मचारी मंहेश मंडलीक व अभिजीत जाधव यांना त्याच्या गुप्त बातमी दारामार्फतीने मिळाली होती. सदर माहिती लागलीच तपास पथकाचे अधिकारी सुबराव लाड यांना कळविली. त्यांनी सदरची माहीती वरिष्ठ अधिकारी यांना कळविली, त्यांनी सदर इसमास ताब्यात घेवुन अटक करणेबाबत आदेश दिल्याने त्याअनुसार सांगली येथे स्टाफ रवाना केला. त्यांनी सदर इसमास सांगली येथुन सापळा लावुन ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे आनले असता त्याच्याकडे अधिक सखोल तपास केला असता त्यांने गुन्हा केल्याचे कबुल केले असुन त्याच्याकडुन ५०,०००/- रु कि चे <u>२६ ग्रॅम वजनाचे चोरी केलेले सोन्याचे दागिणे</u> जप्त करण्यात आले आहेत. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक सुबराव लाड हे करित आहेत.

सदर कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग श्री श्रींकात तरवडे, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री शिरीष सरदेशपांडे साो, सहा. पोलीस आयुक्त श्री मालोजीराव पाटील साो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक सुबराव लाड पोलीस कर्मचारी कृष्णा बढे, महेश मंडलीक, अभिजीत जाधव, गणेश चिचंकर, अभिजीत रत्नपारखी, कुंदन शिदे, सर्फराज देशमुख, सचिन पवार, राहुल तांबे, योगेश सुळ यांनी केलेली आहे.